# महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ

(महाराष्ट्र शासनाचे वैधानिक महामंडळ)
32वा माळा, सेंटर 1, वर्ल्ड ट्रेड सेंटर,कफ परेड मुंबई 400 005.
दुरध्वनी (022)22151847 फॅक्स (022) 22151867 ई-मेल info.mahasecurity@maharashtra.gov.in

**जा.क्र/मरासुम/प्रशिक्षण**/2007/2019 दि - 18/06/2019

प्रती,
मा. शल्य चिकित्सक / सर्जन,
जिल्हा शासकीय रुग्णालय / सिव्हिल हॉस्पिटल /
प्राथमिक आरोग्य केंद्र,
जिल्हा :- ___________

विषय :- महामंडळाच्या प्रतिक्षाधिन यादीवरील पुरूष उमेदवारांची वैद्यकीय तपासणी करणेबाबत...

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येते की, महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळाच्या प्रतिक्षाधीन यादीवरील 700 पुरूष उमेदवारांना [कंत्राटी] सुरक्षा रक्षक पदाच्या प्रशिक्षणासाठी पोलीस प्रशिक्षण केंद्र, जालना येथे पाठविण्यात येत असुन सदरचे प्रशिक्षण दिनांक 05/07/2019 पासुन सूरू होत आहे.

सोबतचे पत्र घेऊन येणाऱ्या उमेदवारांना सुरक्षा रक्षक पदाच्या प्रशिक्षणासाठी ते वैद्यकीय दृष्टया पात्र आहेत किंवा कसे यासाठी जिल्हा शासकीय रुग्णालय / सिव्हिल हॉस्पिटल येथे वैद्यकीय तपासणी करुन घेण्यासाठी सुचित केलेले आहे. वैद्यकीय तपासणीसाठी आलेल्या उमेदवारांची योग्य ते शासकीय शुल्क आकारून खालीलप्रमाणे वैद्यकीय तपासणी करुन शासकीय पावती देण्यात यावी.

| अनु क्र. | वैद्यकीय तपासण्या |
|---|---|
| 1 | CBC |
| 2 | हिमोग्लोबीन |
| 3 | रक्तगट |
| 4 | मानसिक व शारिरिक सदृढ तपासणी (सुरक्षा रक्षक पदाकरीता मानसिक व शारिरिक आरोग्यात सदृढ असणे आवश्यक आहे आणि तसेच कर्तव्याच्या कार्यक्षमतेमध्ये व्यत्यय आणण्याच्या कोणत्याही दोष/विकृतीपासुन मुक्त असणे आवश्यक आहे.) |
| 5 | डोळयांची तपासणी (कमीतकमी दुरदृष्टी दोन्ही डोळयांमध्ये 6/6 आणि 6/9 असावे तेही चष्मा न घालता व तसेच उच्च ग्रेड रंग दृष्टीक्षेप) |

| | |
|---|---|
| 6 | **गुडघा मध्ये जास्त गॅप, सपाट पाय, जास्त शिरा** (Varicose vein), **मोतीबिंदु असे प्रकार नसावेत**. (knock knees, flat feet) |

वैद्यकीय तपासणी करुन उमेदवार सुरक्षा रक्षक पदाच्या प्रशिक्षणास पात्र आहेत किंवा कसे याबाबत वैद्यकीय प्रमाणपत्र उमेदवारांना देण्यात यावे, हि विनंती.

18/6/19

[प्रज्ञा जेडगे]
पोलीस अधिक्षक तथा महाव्यवस्थापक [भरती/प्रशिक्षण]
महाराष्ट्र राज्य सुरक्षा महामंडळ, मुंबई.